खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ता. खेड, जि. पुणे

## द्वितीय वर्ष कला (SYBA)

## मराठी (एस - २)

## सत्र चौथे

# विषय : साहित्य समीक्षा विचार

SANJAY MARHRM

## प्रकरण ५ ) साहित्य आणि समीक्षा यांचे परस्पर संबंध

डॉ. संजय शिंदे
उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ई - मेल : dr.sdshinde80@gmail.com भ्रमणध्वनी क्र. : 9604309060

# विषय - S 2 साहित्य- समीक्षा विचार (सत्र – दुसरे)

## प्रकरण ५) साहित्य आणि समीक्षा यांचे परस्परसंबंध

### ५.१ - साहित्यकृती आणि रसिक वाचक

### ५.२ - साहित्यकृती आणि समीक्षक

### ५.३ - साहित्यसमीक्षा व्यापाराचे घटक

---

### ५.१ साहित्यकृती, रसिक आणि वाचक

**'लेखक - कलाकृती - रसिक, वाचक, समीक्षक'** हे सर्व घटक 'साहित्यसमीक्षा' व्यापाराशी संबंधित आहे. या सर्व घटकांना साहित्यकृती आनंददेत असते. लेखकाला निर्मितीचा आनंद असतो तर रसिक वाचक-समीक्षक यांना वाचनाचा, आस्वादनाचा आनंद असतो. साहित्याची प्रयोजने द्विविध असतात - कवीच्या दृष्टीने व रसिकाच्या दृष्टीने कवीस यश, अर्थप्राप्ती इ. प्रयोजने तर रसिकाच्या दृष्टीने व्यवहारज्ञान व उपदेश ही प्रयोजने होत. पण वाङ्मयाचे सर्वश्रेष्ठ प्रयोजन म्हणजे आनंद आणि तो आनंद काव्यनिर्माता व रसिक दोघांनाही सारखाच प्राप्त होतो कवीस काव्यनिर्मिती व काव्यास्वाद असा उभयविध आनंद प्राप्त होतो. वाचकास फक्त आस्वादाचा आनंद मिळतो.

#### काव्यनंदाची निर्मात्याच्यादृष्टीने मीमांसा

#### १) क्रीडेचा आनंद

क्रीडा स्वेच्छेने असते म्हणून त्यातून आनंदाचा अनुभव येतो हेगेल म्हणतो, 'माणसातील अधिक जीवनशक्ती निरूपद्रवीपणामुळे बाहेर टाकल्यामुळेच क्रीडेतून आनंद मिळतो वाङ्ग्यातूनही भय, अनुकंपा वगैरे भावनांचा संचय कमी झाल्यामुळे आनंद वाटतोक्रीडेत हालचाल व परिश्रम होतात. त्यामुळे कंटाळवाणेपणा जातो व सौख्य वाटते. तसेच वाङ्ग्यातही कलावंताच्या शक्तींना हालचाल व परिश्रम यामुळे सौख्य वाटते

### २) नवनिर्मितीचा आनंद

केवळ हालचाली व परिश्रम यामुळे आनंद झाला असता, तर श्रमिकांना व शेतकऱ्यांना तो का न व्हावा ? म्हणून आनंद काहीतरी नवीन वस्तू निर्माण करण्यात असतो. कलावंताला आपल्या कलाकृतीबद्दल अपत्यवत प्रेम वाटत असते.

### ३) आत्माभिव्यक्तीचा आनंद :

केवळ यश, धन वा प्रचार यांसाठी नव्हे, तर आपल्या भावनांचा क्षोम व्यक्त करण्यासाठी स्वयंस्फूर्तीने कवी काव्य करीत असतो. आपली सुखदु:खे भाव-विचार इ. चा अविष्कार केल्याशिवाय त्यास चैन पडत नाही. म्हणून आपल्या व्यक्तीत्वास तो कलेतून व्यक्त करू पाहतो. स्वतःला प्रतीत झालेले सौंदर्य व जीवनानुभव तो कलेतून प्रगट करू इच्छितो. आपल्या आत्माभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यास कोणतेही बंधन त्याला अप्रिय वाटते. आत्माविष्काराच्या स्वाभाविक व प्रबळ प्रेरणेतून त्यास वाङ्मयनिर्मितीचा आनंद प्राप्त होतो

केवळ क्रीडा, निर्मिती व आत्माविष्कार या तीनही प्रकारांत प्रकट होणारा आनंद हा विशुद्ध असतो. तोच कलावंताचा आनंद होय

लेखक आणि वाचक यांच्यातील सहसंबंधसांगताना श्री. रवींद्र ठाकूर म्हणतात, 'वाचक आहे म्हणून लेखक आहे आणि लेखक आहे म्हणून वाचक आहे ते एकमेकांसाठी आहेत लेखक साहित्यकृतीची निर्मिती एकांतात करत असला तरी त्याच्या समोर वाचत असतोच किंबहुना तो वाचकासाठी लिहित असतो वाचक नसेल तर साहित्यकृतीला अर्थ होणार नाही.' म्हणून लेखक आणि त्याचं वाचन ही लेखक आणि वाचक यांची सहनिर्मिती ठरते वाचकाच्या प्रतिसादाशिवाय लेखन हे लेखन करतच नाही. समीक्षा हा साहित्यिक व वाचक यांच्यातील एक महत्त्वाचा दुवा असतो. म्हणून साहित्यकृतीचा वाचक या संकल्पनेविषयी अनेक समीक्षकांनी वेगवेगळ्या भूमिका मांडल्या आहेत.

कलानिर्मिती आणि तिचा वाचकावरील परिणाम महत्त्वाचा आहेच. पण साहित्य केवळ वाचकाला आनंद देत नाही, तर त्याचे उन्नयन घडवून आणते. संत रामदास म्हणतात तसे 'शहाणे करून सोडावे सकळ जन' असे हे असते. वाचकाला काहीतरी माहिती देण्यासाठीही कलाकृतीचा जन्म होतो आणि ते तिचे एक प्रयोजनही असते.



SANJAY MARATHI HRM

फ्रेंच समीक्षक पॉल रिकर याने साहित्यकृती आणि वाचन या संदर्भात काही मते मांडली आहेत त्याच्या मते, वाचनक्रियेच्या पहिल्या अवस्थेत साहित्यकृतीच्या संरचनेचे म्हणजे तिच्या घटकांमधील अंतर्गत संबंधाचे विश्लेषण व अर्थविवरण केले जाते. वाचन क्रियेच्या दुसऱ्या अवस्थेत साहित्यकृतीचे विश्व आणि वाचकांचे विश्व यांच्यामध्ये सतत संवाद चालू असतो या संवादातूनच साहित्यकृतीची जडणघडण होत असते जसे लेखन करताना देहरूपाने वाचक जरी समोर नसला तरी तो समोर ठेवूनच साहित्यकृतीची निर्मिती आणि त्यात बदल होत असतात. साहित्यकृतीला वाचक देत असलेला प्रतिसाद साहित्यकृतीच्या आककलना बरोबरच वाचकाला स्वतःविशयीचे ज्ञान-आत्मज्ञान, स्व आकलन करून देत असतो.

आपण साहित्यकृतीचे वाचन का आणि कसे करतो ? हे सांगावयाचे झाल्यास साहित्यकृतीच्या शब्द वाक्ये, परिच्छेद, प्रकरणे अशा एकेका घटकाचे आकलन करीत करीत तिच्या संपूर्ण समष्टीचे वाचक वाचन पूर्ण करतो. आणि जाणवलेल्या आकलनाच्या अंगणात तो पुन्हा शब्द घटनादी घटकांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतो. शब्दाचा अर्थ कळल्याशिवाय वाक्याचा अर्थ कळत नाही आणि वाक्याचा अर्थ उलगडल्याशिवाय घटकाचा अर्थ कळत नाही.

ब्रिटिश-अमेरिकन समीक्षक **जोनाथन कलर याने 'सक्षम वाचका'ची कल्पना मांडली.** 'वाचक व लेखक या दोघांनीही चिन्हव्यवस्थेवर प्रभुत्व मिळवलेले असते आणि या प्रभुत्वावरच त्यांचे वाचक वा लेखक म्हणून असलेले सामर्थ्य अवलंबून असते' असे कलर म्हणतो. म्हणजेच वाचकाजवळ "साहित्यिक ज्ञानक्षमता" असते हे आपल्याला मान्यच करावे लागते. साहित्यिक ज्ञानक्षमतेच्या संकल्पनेत भाषा, साहित्य व संस्कृती अशा तीन प्रकारच्या संकेतांचे ज्ञान वाचकाला असावे, हे अपेक्षित असते. अशा सर्व प्रकारच्या ज्ञानदृष्टीने वाचक 'सक्षम' असला पाहिजे, असे कलर याचे म्हणणे आहे.

**डेव्हिड ब्लीश म्हणतो की, वाचक संहितेला प्रथम उत्स्फूर्त प्रतिसाद देतो आणि नंतर चिंतन क्रियेच्या उत्स्फूर्त प्रतिसादाला एक विशिष्ट अर्थ देत असतो. म्हणजेच त्याचे एका विशिष्ट दृष्टीतून अर्थनिर्णयन करीत असतो.** वाचक हा संहितेचा अर्थ लावण्यासाठी त्या वाचनाचा आणि त्या वाचकसमूहाचा एक

SANJAY MARHRM

घटक होऊन जातो. व्यक्ती म्हणून तो तसा आली तरच असतो. डॉ. हरी नरके त्यांच्या मते, साहित्य अगर समीक्षा उत्तम किंवा श्रेष्ठ तीच असू शकेल, जी निदान वाचनीय, प्रवाही, नेमकी आणि वाचकांना समजेल अशी असेल.

लेखकाशी समीक्षकांचा संबंध काय? असे अनेकदा विचारले जाते. कारण लेखकाने लिहावे आणि वाचकाने वाचावे, त्यासाठी समीक्षकाची मध्यस्ती कशास हवी ?पण ती आवश्यकता असते कारण समीक्षक जेव्हा एखाद्या कलाकृतीची समीक्षा करतो आणि वाचकाला ती साहित्यकृती समजावून देतो म्हणूनतो लेखक आणि वाचक यामधला दुवा ठरतो. समीक्षक लेखकाच्या बाबतीत जसा महत्त्वाचा आहे तसाच तो वाचकाच्या बाबतीतही महत्त्वाचा ठरतो.

**डॉ. राजेन्द्र बनहट्टी मानतात तसे, 'वाचकाचे मन हे आस्वादाला अधिक पोषक किंवा अधिक आस्वादक्षम करण्याच्या संदर्भात समीक्षक महत्त्वाची भूमिका बजावू शकतो.** तो वाचकाच्या लक्षात न आलेली, त्याला न जाणवलेली साहित्यातील सौंदर्यस्थळे, अनुभवस्थळे दर्शवून वाचकाच्या आस्वादाचा अनुभव अधिक गहिरा, परिपूर्ण आणि अधिक अर्थपूर्ण करू शकतो त्यामुळे वाचकाच्या आस्वादाचा आनंद अधिक तरल आणि समृद्ध होऊ शकतो. अर्थात हे फक्त साहित्यातील अनुभवाला स्वतंत्र व अलिप्त वृत्तीने सामोरा जाणारा समीक्षक असे करू शकतो. त्याची समीक्षा ही संपूर्णत साहित्यलक्ष्यी असते. सहाजिकच अशी साहित्यलक्ष्यी समीक्षा सदैव वाचकाभिमुख असते. कारण ती वाचकासाठीच असते. ती वाचकांशी सुसंवाद साधते ती समीक्षा क्लिष्ट परिभाषेपासून आणि दुर्बोधतेपासून मुक्त असते

## ५.२ साहित्यकृती आणि समीक्षक

लेखक आणि समीक्षक हे दोघेही समाजाचा एक घटक असतात आणि माणूस म्हणून त्यांच्यावर तेथील सामाजिक, सांस्कृतिक व इतर काही परंपरांचा, घटकांचा प्रभाव पडत असल्यामुळे ते त्या काळाशी समकक्ष असतात **'जो साहित्य निर्मिती करतो तो लेखक किंवा साहित्यिक.'** 'समीक्षक म्हणजे एखाद्या परिस्थितीचे, साहित्यकृतीचे, कलाकृतीचे तसेच सामाजिक व राजकीय स्थितीचे अवलोकन करून त्यावर प्रामाणिक मत नोंदविणारा व्यक्ती होय.' लेखक व समीक्षक यांची त्या कालखंडाची बांधिलकी असते त्याचे भान जागृत ठेवूनच



SANJAY MARHIRM

निर्मितीनंतरचे आणि समीक्षेच्या वेळचे भान दोघेही ठेवतात विशिष्ट कालखंडाशी, विशिष्ट वर्गाशी कलाकृती आणि दोघेही निगडित असतात आणि जुळवून घेत असतात कोणतीही समीक्षापद्धती ही साहित्यकृती सापेक्ष तर असतेच पण ती समीक्षकसापेक्षही असते. एखाद्या साहित्यकृतीच्या गुणदोषांचे परीक्षण आणि मूल्यमापन म्हणजे समीक्षा असते आणि साहित्यकृतीतील सौंदर्य कसे वाचकांपर्यंत पोहोचते आहे यावरही तिचे मूल्य अवलंबून असते

**प्रभाकर बागल यांनी 'साहित्य आणि सांस्कृतिक संवेदन' या आपल्या ग्रंथाच्या प्रास्ताविकात** लिहिले आहे की, साहित्यकृतीच्या अंतरंगात शिरून तिला समजून घेणे आणि समजून घेताना लक्षात आलेल्या आपल्या मर्यादांचे भान ठेवणे, त्या कमी करण्यासाठी तिच्या आशयाकडे वेगवेगळ्या कोनातून पाहण्याचा प्रयत्न करणे, त्यासाठी अभ्यासक्रम आणि संदर्भसूचीतील पुस्तकांच्या पलीकडे जाऊन काही मिळतं का ते पाहणं या धडपडीतून वाचनाचा ध्यास लागतो आणि सतत वाचन, आकलन आणि अर्थनिर्णयन यामुळे अजोड अशी वाचकनिष्ठाच चांगला आणि सकारात्मक विचार करणारा समीक्षा घडवते आणि असा समीक्षक साहित्य व्यवहारासंबंधी व्यक्तिनिष्ठ भाष्य करतो

बागले म्हणतात, 'आपण शब्दबद्ध करत असलेले आपले आकलन त्या संहितेच्या अर्थाला थोडं तरी नव्यानं पाहायला लावणारं आहे की नाही, हा विचार त्यावेळी मनाला स्पर्शून जात असतो. वाचकाला प्रभावित करण्याचा कोणताही विचार त्यात नसतो.' कुठलीही साहित्यकृती ही पात्र, प्रसंग, भाषा, रूपके, मिथके यांनी आकाराला आलेली एक व्यवस्था असते. या व्यवस्थेचं दार किलकिलं करून कलावंताने ज्या कलाजाणिवेला आकारीत केलंय, तिला समजून घेण्यासाठी आपण हे लेखन केलं, असंही बागले सांगतात प्रा. प्रभाकर बागले यांचा साहित्य, साहित्यकृती आणि समीक्षक यांच्या बाबतचा विचार श्रीकांत देशमुख अधिक सविस्तर स्पष्ट करतात. ते म्हणतात, प्रत्यक्षातील वास्तव आणि साहित्यातील वास्तव जोडून समीक्षक आपला दृष्टिकोन मांडत असतो. त्या प्रत्येक दृष्टिकोनात त्याच्या परिसराचं संवेदन दडलेले असते लेखकाचे विश्व किंवा त्याने मांडलेले साहित्यातील विश्व समजून घेणे किंवा अनुभवणे हे चांगल्या वाचकाचं काम असतंजाणवलेले अनुभव निःस्वार्थपणे, निरागसतेने इतरांसाठी मांडण्याचे काम समीक्षक करतो कधीकधी लेखकच समीक्षा काही असू शकतो. **'एखाद्या**

**व्यक्तीच्या ठिकाणी साहित्यकृती निर्मिती आणि तिची समीक्षा करणे या दोन्ही गोष्टी असू शकतात' हे डॉ. ग. ना. जोगळेकर म्हणतात, ते खरेच आहे.**

साहित्यातून साहित्यिक हा माणसाच्या भोवतालच्या परिसराचे लेखनातून संवाद साधतो आणि आलेले अनुभव, जाणिवा जमा लेखक मांडतो किंवा समीक्षक त्याचे आकलन करतो तेव्हा लेखकाचा व्यक्तिगत अनुभव हा व्यक्तिगत न राहता सार्वजनिक होतो. त्या अनुभवांचेच समीक्षक साधारणीकरण करत असतो

खरं तर 'एखाद्या विचाराशी व अनुभूतीशी बांधलेल्या बांधिलकी पेक्षा विचारशक्ती आणि अनुभवक्षमता मुक्त ठेवणारी सामाजिक जाणीव अधिक महत्त्वाची ठरते.' सामायिक जाणीव म्हणजे सामिलकी. सामिलकी म्हणजे घटनांच्या प्रवाहात मनाने सामील होणे, आणि संस्कृतीच्या वरच्या बांधकामावर नव्हे तर तिच्या मुळाशी असलेल्या आधारभूत मूल्यांची जाण आणि त्यासाठी आग्रह असणे होय' यासाठी लेखकाला आणि विचारांना प्रवाही ठेवणे महत्त्वाचे असते. विचारांचे प्रवाहीपण नाकारणे म्हणजे त्याचे अस्तित्व नाकारणे आणि पर्यायाने संस्कृतीचा विकासही नाकारणे होय.

## ५.३ समीक्षेतील साहित्याच्या आकलन, आस्वाद, विश्लेषण, अर्थनिर्णयन, मूल्यमापन यांचे स्थान

### वाचन, आकलन आणि विश्लेषण :

साहित्यकृतीचे वाचन हे समीक्षककडे वळण्याची खरं तर पहिली पायरी आहे. साहित्याचे वाचन म्हणजे अनुभव घेणेच आहे. तिच्या वाचनाने आपली भाषिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षमता वृद्धीस लागते आणि मग आपण साहित्यकृतीच्या विश्लेषणाकडेही वळतो.\

प्रथम साहित्यकृतीचे वाचन आणि वाचन करता करता तिच्यातील आशयाचे, पात्रांचे, प्रसंगांचे आणि भाषेचेच आकलन होते आणि सौंदर्य जाणवते. म्हणून कोणत्याही साहित्यकृतीची समीक्षा करण्यापूर्वी तिचे वाचन करणे आणि आकलन होणे आवश्यक आहे.

**लेखकाने लिहिलेल्या या साहित्यकृतीचा वाचनानेच त्या साहित्यकृतीला पूर्णत्व लागते. त्या आशयाचा, तिच्या भाषेतील सौंदर्याचा, तिच्यातील अनुभवांचा प्रभाव वाचक, रसिक आणि समीक्षकावर**



SANJAY MARHRM

**होतो.** हा वाचन आणि आकलनाचाच परिणाम असतो. या परिणामा शिवाय त्या कलाकृतीतील सौंदर्य, मर्म समजत नाही. एकाच वाचनात हे आकलन आणि परिणाम समजू शकत नाही. म्हणून पुन पुन्हा वाचून आकलन होते. हे पुन: पुन्हा वाचणे म्हणजे साहित्यकृतीचा आस्वाद घेणे आहे. आपण आस्वादात रमतो कारण वाचनाने साहित्यकृतीचे आकलन होत असते. हे आकलन जितके प्रभावी होईल तितकाच तिचा आस्वाद परिणामकारक ठरतो. हा संवाद अधिक काळ आपण घेऊ शकतो. आस्वादासाठी आकलन आणि आकलनासाठी वाचन महत्त्वाचे ठरते. साहित्याच्या आकलना्रच आस्वाद अवलंबून असतो.

**अखंड वस्तूचे अनेक घटकात विघटन करून त्याचे सविस्तर स्पष्टीकरण करणे म्हणजे विश्लेषण होय.** साहित्यकृती अशीच अनेक घटकात आपल्याला विभागता येते आणि तिचे हे घटक पुन्हा परस्परांशी निगडित होऊन ती एकसंधही होते. विश्लेषण दोन प्रकारचे असते. एक अंतर्गत आणि दुसरे बाह्य स्वरूपाचे अंतर्गत विश्लेषण म्हणजे कलाकृतीचा आशय, विषय, तिची भाषा आणि तिचे विशेष, शैली, शब्दरचना, लेखकाची प्रतिभा यांचे विश्लेषण होय. बाह्य विश्लेषण म्हणजे लेखक व त्याचे जीवन आणि एकूणच जगणं, जिथे तो घडला, वाढला तो समाज, ती सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक स्थिती यांचे विश्लेषण होय

**साहित्य समीक्षाचे खरे उद्दिष्ट आकलन आहे.** आकलन झाल्याशिवाय समीक्षकाला कलाकृतीचे सौंदर्य समजत नाही. पहिल्या वाचनामध्ये त्याला कथानक ढोबळपणे समजते. नंतर त्याला त्या कथानकात जागा किंवा ओळखीच्या व्यक्ती दिसू लागतात, त्या व्यक्तींच्या आठवणी आठवू लागतात, अनुभव कळू लागतात आणि मग ती कलाकृतीतील आठवण त्याची आपलीशी होऊन जाते आणि मगच त्याच्यावर सहजतेने भाष्य लिहिलं जातं.

**आस्वाद :**

**समीक्षेची दुसरी पायरी म्हणजे आस्वाद घेणे.** आस्वाद घेणे म्हणजे कलाकृतीमध्ये दंग होणे आहे किंवा रस घेणे होय. आस्वाद आणि आस्वादानंतरचे लेखन म्हणजे साहित्यकृतीचे नेमकेपणाने केलेले रसग्रहण आहे. सामान्य वाचकाचा आस्वाद, रसिकाचा आस्वाद आणि एका जाणकार अभ्यासकाने घेतलेला साहित्यकृतीचा आस्वाद यात फरक तर असणारच. सामान्य वाचकाला आणि रसिकाला त्यांच्या आस्वादानंतरच्या निर्णयापर्यंतच्या

SANJAY MAR HRM

प्रवासाची पायवाट समीक्षक त्याच्या लेखनाने करतो. कधी तो साहित्यकृतीचे विश्लेषण करतो तर कधी शास्त्रीय नियमांच्या आधारे तिचे मूल्यमापन करतो त्याने काहीही केले तरी ते समीक्षेतच मोडते.

तिच्यामधून घडणारे जीवनदर्शन हे समीक्षकाला आकर्षित करीत जाते हे आकर्षित करणारे जीवनदर्शन समीक्षक साहित्यकृतीशी जोडून घेतो आणि जाणवलेलं आपल्या शब्दात मांडत जातो हे प्रारंभीचे लेखन असते. असे लेखन करून समीक्षक एक प्रकारे पुनर्निर्मिती करत असतो. कलावंताने अनुभव कसा घेतला ?, त्याला तो कसा जाणवला ?, त्याला ती साहित्यकृती का आवडली ?, नेमकं काय आवडलं ? अशा प्रकारची त्याला पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे समीक्षक शोधू लागतो तसतसे त्याला साहित्यकृतीमधील सौंदर्यस्थळे जाणवू लागतात यातून जाणवलेले साहित्यकृतीतील सौंदर्य आणि आलेला अनुभव या आस्वादाच्या पायरीवर मनात किंवा कागदावर उतरत असतो. **आस्वादासाठी वाचकाला समीक्षा प्रेरणा देते**. चांगल्या साहित्याची ओळख वाचकाला करून देतानाच नेमके काय आणि कसे वाचावे याचेही मार्गदर्शन समीक्षा करते. परिचय करून देऊन वाचकाला साहित्याकडे वळून लेखकाच्या लेखनाचा दर्जा काय असावा, याची जाणीव त्या लेखकाला देते. **वाचकाने काय वाचले पाहिजे याचे मार्गदर्शन समीक्षा करते.** लेखक लिहीत असताना, आपण कोणत्या दर्जाचे लिहितो आहे ? वाचकांना ते आवडेल की नाही हे लेखकाला समजत नाही. तो लिहीत राहतो, त्याला तो दर्जा आणि लेखनाचे भान देण्याचे काम समीक्षा आस्वादनाच्या रुपाने आपल्या समोर ठेवते. आणि साहित्यव्यवहार दिशाहिन होऊ नये, यासाठी मोलाची मदत करते. त्यात त्या साहित्यकृतीचे अर्थग्रहणसुद्धा सामावलेले असते. **त्याचबरोबर समीक्षेत गुणग्रहण, रसग्रहण, मर्मग्रहण, सौंदर्यग्रहण या गोष्टींचाही समावेश होतो.** ती साहित्यकृती इतर साहित्यकृतीपेक्षा कशी वेगळी आणि श्रेष्ठ आहे, त्याचप्रमाणे ही श्रेष्ठता तिच्या कोणत्या घटकांमुळे येते याचेही स्पष्टीकरण समीक्षक आपल्या समीक्षेमधून मांडतो.

वाचकमन आस्वादास पोषक आणि आस्वादक्षम करण्याचा प्रयत्न समीक्षा करते. समीक्षक खरं तर वाचकाने वाचन करूनसुद्धा त्याला न दिसलेले साहित्यकृतीतले सौंदर्य उलगडून दाखवतो आणि त्याला अनुभवाकडे वळवितो, त्याचा अनुभव समृद्ध करण्याचा प्रयत्न करतो, ते आपल्या आस्वादास प्रेरक असलेल्या आकलनशील समीक्षेने.

SANJAY MARATHI RM

वाचकांपर्यंत जेव्हा हे सर्व पोहोचते तेव्हा वाचकाच्या आस्वादाचा आनंद अधिक तरल आणि समृद्ध होतो हे काम केवळ समीक्षक करू शकतो.

**मूल्यमापन :**

**समीक्षेची पुढची पायरी म्हणजे समीक्षेचे मूल्यमापन होय.** समीक्षकाने एखाद्या साहित्यकृतीचा आस्वाद घेतला आणि लिहून काढला म्हणजे त्याची त्याने ती समीक्षा केली आहे असे म्हणता येणार नाही. समीक्षकाने कलाकृतीच्या श्रेष्ठ-कनिष्ठतेचे प्रमाण समजून घ्यायला हवे. कलाकृतीचे मूल्यमापन करायला हवे. तिचे मूल्यांकन करायला हवे. समीक्षकाचे आकलन आणि आस्वादन जेवढे विविध स्वरूपाचे असेल किंवा आस्वाद जितका सखोल स्वरूपाचा असेल तेवढे त्याचे मूल्यमापन हे बिनचूक आणि प्रमाणित होते मूल्यमापन जर वरवरचे आणि उथळ असेल तर समीक्षकाने त्या साहित्यकृतीला न्याय दिला आहे असे म्हणता येणार नाही. अपरिहार्यता, संभाव्यता, स्वाभाविकता ही मूल्ये खरं तर सर्वचकालसापेक्ष आहेत. ती काळानुसार बदलत असतात. काही मुल्येे मात्र शाश्वत असतात. त्यांच्यामध्ये **सत्य, न्याय, स्वातंत्र्य, शिव, सौंदर्य यांचा समावेश होतो.** या सर्व मूल्यांचे साहित्यकृतीतील दर्शन घडविले तर आस्वादाची पूर्णता होते आणि साहित्याचेही मूल्यमापन पूर्णतेकडे वळते. मूल्यमापनामुळे साहित्यकृतीचा दर्जा ठरतो साहित्याचे व्यवस्थापन होण्यास मदत होते. साहित्यिक अभिरूचीला वळण लागते. चांगले-वाईट ठरवण्यासाठी सामान्य वाचकालाही ही गोष्ट अत्यंत मार्गदर्शक ठरते. श्रेष्ठ कलाकृतीची सौंदर्यस्थळे ही समजली तर वाचकांची अभिरुची प्रगत होते; नव्हे तर तिला एक प्रकारचे वेगळे स्वरूप लाभते आणि समीक्षेची प्रक्रिया एका निर्णयात्मक स्वरुपापर्यंत पोहोचण्यास मदत होते. **आधुनिक समीक्षा आणि साहित्यविचारात मूल्यमापन ही महत्त्वाची पायरी मानली जाते,** त्यामुळे समीक्षकाने साहित्यकृतीबाबत काय **निर्णयन केलेले आहे हेही समजणे महत्त्वाचे ठरते. समीक्षा हा एक शोध आहे. कोणत्याही साहित्यकृतीचे स्वरूप, त्याची वैशिष्ट्ये, तिचे सौंदर्य, तिच्या महानतेचे रहस्य यांचा शोध समीक्षक स्वतःसाठी घेत असतो.** कारण त्याने लिहिलेली ती समीक्षा म्हणजे ते त्याचे प्रकट चिंतन असते कोणतीही साहित्यकृती हे स्वतःचे नियम आणि तंत्र घेऊन अवतीर्ण होते, ते समजून घेणे हे समीक्षेचे खरे कार्य आहे

SANJAY MARKHRM

**मूल्यमापन करताना तिचे कलाकृतीची रचना, तिचे स्वरूप, घटक, मांडणी व निर्मितीप्रक्रिया यांचा विचार करणे अनिवार्य ठरते.** तिच्या मूल्यमापनातच तिचे मूल्य निकष दडलेले असतात. कधी कधी लेखनातून मूल्यांची बंडखोरी येते जुन्यांना नकार देऊन नवीन काही निर्माण होत राहतात पण ही नवी मूल्यं कालांतराने जुनी होतात अशी स्थित्यंतरे निर्माण प्रक्रिया सतत निर्माण होत राहतात. या स्थित्यंतरांचे मूल्यमापन समीक्षक करतो आणि झालेले नवी संरचना वाचकांना समजावून देतो.

**अर्थनिर्णयन :**

प्रत्येक साहित्यकृतीला तिचा म्हणून एक अर्थ असतो. साहित्यकृती दडलेला तो अर्थ तो तिच्या संहितेत दडलेला असतो. तसेच वाचकाच्या वाचनाशी, मनाशीही जोडलेला असतो. तो अर्थ वाचताना निर्माण होतो. लेखकाने केलेला आत्माविष्कार या अर्थनिर्णयात समाविष्ट असतोच ; तो ज्ञानविस्ताराने आणि स्पष्टीकरणाने चांगल्या प्रकारे व्यक्त होतो.

**समीक्षेची विविध उद्दिष्टे आहेत, त्यांना अनुसरून आकलन दर्शन आणि मूल्यमापन ही उद्दिष्टे लक्षात घेऊनच खरं तर समीक्षेचे वेगवेगळे प्रकार आणि त्याच्या पद्धती निर्माण होतात.** साहित्य समीक्षाच्या आकलनासाठी अर्थग्रहण आधी काही पायऱ्या सांगितल्या आहेत. त्यातील अर्थग्रहण ही पायरी घेतली, तरी केवळ अर्थलापनिकेस प्राधान्य देणारा संस्कृत टीकेचा प्रकार समोर येतो. हे करण्यास साहित्यकृतीची मूळ अधिकृत संहिता अगर पाठ निश्चित करणे आवश्यक असते. ते करणारा समीक्षा व्यापार हा 'पाठचिकित्सा' नावाने ओळखला जातो. मात्र पाठचिकित्सेच्या आधारे मूळ अधिकृत संहिता निश्चित करणाऱ्या लेखनाचा समावेश साहित्य समीक्षेत केला जात नाही. अर्थाच्या जवळ असलेला हा समीक्षा प्रकार अलंकारिक समीक्षेचा वा टीकेचा असेल. विशिष्ट कलाकृतीचे गुण आणि अलंकार ही जी अंगे आहेत, त्यांची चर्चा करणारी ही समीक्षा असेल.

बऱ्याच वेळा अनेक साहित्यकृती या समीक्षकांना गोंधळात टाकत असतात. म्हणून समीक्षक त्यांना गोंधळात टाकणारी परिस्थिती किंवा घटना, पात्रे, प्रसंग या गोष्टी त्या साहित्यकृतीत पुन पुन्हा वाचत असतात. उदा. ग्रेस यांची कविता जर नुसती वाचली तर ती कळली आहे असा दावा आपण करू शकत नाही **ग्रेस यांची कविता** प्रत्येक वाचनाबरोबर वेगवेगळा अर्थ प्रदान करीत जाते. म्हटलं तर ती दुर्बोध आहे आणि म्हटलं तर ती अनेक अर्थ

प्रदान करणारी आहे. पण समीक्षकाला अर्थनिर्णयन करणे अत्यंत आवश्यक असते. तो कधीकधी विविध समीक्षा पद्धतींचा वापर करतो आणि अर्थनिर्णयाच्या स्थितीपर्यंत पोहोचतो. त्याने केलेली समीक्षा परिपूर्ण किंवा अंतिम असेल असे मानायचे काहीएक कारण नाही. कारण कालसापेक्ष किंवा व्यक्तीसापेक्षतेने काही बदल घडतात, हे आपल्याला लक्षात घ्यावे लागते. समीक्षक एका अर्थ निर्माण करतो आणि त्याला जाणवलेले अर्थ मांडण्याचा निर्णय घेऊन जे मांडतो त्या पायरीला आपण अर्थनिर्णयन असे म्हणू. श्रेष्ठ कलाकृती ठरवण्यासाठी तिचे मूल्यमापन, त्याची वर्गवारी करणे, तिच्यातल्या सौंदर्यस्थळांना भेट देणे वगैरे सगळ्याच गोष्टी या पायरीवर घडत असतात या कलाकृतीचा नवे नवे अर्थ लावणे आणि ती कलाकृती कशी वेगळी आहे ? भूतकाळामध्ये ती कलाकृती कशी होती ? वर्तमानकाळात कशा प्रकारचे प्रकटीकरण ती करते आहे ? आणि भविष्यातही ती कलाकृती कसा संवाद साधणार आहे ? याबाबतचा निर्णय घेऊन त्या साहित्यकृतीचे समीक्षण करणे हे या अर्थनिर्णयन पायरीवर अपेक्षित आहे. समीक्षक या अर्थनिर्णयामुळेच आपल्या समीक्षा लेखनाला प्रगल्भ करू लागतो.

साहित्यकृतीमधील सौंदर्य हे तिच्या अंतरंगात व बहिरंगात दडलेले असते त्यामुळे कलाकृतीचा आशय व अभिव्यक्ती या दोघांचेही सौंदर्य न्याहाळणे महत्त्वाचे असते. असा दृष्टिकोन हळूहळू वाचकांचा निर्माण होण्यासाठी समीक्षा वाचकावर त्या प्रकारचा समीक्षेतून संस्कार करते

लेखकाने निर्माण केलेल्या अनुभवाद्वारे समीक्षक हा वाचकाला कलाकृतीच्या मर्माकडे घेऊन जातो तिचे अंतरंग उलगडून दाखवतो अशा कलाकृतीच्या माध्यमातून समीक्षक आपल्या समीक्षेतून एक निर्णायक असा अनुभवाविष्कार मांडतो आणि वाचकाला एका विशिष्ट निर्णयांपर्यंत पोहोचवतो

**तात्पर्य स.दा. कराडे म्हणतात त्याप्रमाणे, 'कोणत्याही कलाकृतीचे मूल्यमापन करताना त्या कलाकृतीचे वर्णन आणि कलाकृतीचे अन्वयार्थ बोधन आवश्यक असते.'** साहित्यकृतीच्या मुळाशी जी तत्त्वे आणि सिद्धांत असतात ते निदर्शनास आणणे व सिद्धांताच्या आधारे साहित्यकृतीच्या आणि तिच्या प्रगल्भतेचा निर्णय घेणे समीक्षेमध्ये अभिप्रेत असते. गंगाधर पाटील म्हणतात की, 'साहित्याच्या महानतेचे मूल्यनिकष हा भाग समीक्षा व्यवहारातील मूल्यमापनाचे एक अंग आहे **विश्लेषण, अर्थनिर्णयन, मूल्यमापन, शब्दांकन, संहिता सर्जन ही समीक्षा व्यापाराची चार प्रमुख अंगे आहेत वा. ल. कुलकर्णी म्हणतात,** तसे 'समीक्षालेखन

हे साहित्याच्या एकंदर स्वरूपाविषयीच्या आपल्या कल्पना अधिक चांगल्या प्रकारे निर्दोष करून घेण्यासाठीच करायचे असते.' कोणत्याही कलाकृतीची समीक्षा करताना त्या कलाकृतीवर अन्याय होणार नाही याची काळजी त्या समीक्षकाने घेणे गरजेचे आहे. कारण साहित्य हे मुळातच परिणामबहुल असल्यामुळे त्याच्या संबंधीची समीक्षा ही विविधरंगी आणि विविध स्वरूपाची असते. व्यक्तिगत रसास्वादापासून तर समीक्षकाच्या व्यक्तिगत विचारांपासून साहित्यवस्तूची वस्तुनिष्ठ सौंदर्यात्मक तात्विक मीमांसा करण्यापर्यंत अनेक प्रकार संभवतात. साहित्याचे आकलन करून देणारी साहित्याची समीक्षा ही साहित्याच्या साहित्यपणाला धक्का न लावता साहित्याच्या अंतरंगाला साहित्याचा आस्वाद, आकलन आणि मूल्यमापनाला दिशा, दृष्टी व चौकट पुरविते. साहित्याचा आस्वाद सुलभ व सुकर बनविते. वाचकाला आशय आकलनाला मदत करते; नव्हे ते सोपे करण्यास मदत करते.

**समीक्षा म्हणजे साहित्याचे अंतरंग व बाह्यरंग वगळून पाहण्याच्या दृष्टीने एक शोधयात्रा असते. या यात्रेचा प्रवास समीक्षकासाठी आनंदी आणि लेखकासाठी वेदनादायी होऊ शकतो. पण वाचक रसिक यांच्यासाठी मात्र रंजनात्मक, प्रबोधनात्मक आणि आनंददायी असतो हे मात्र खरे.**

---

**अध्यापन साहित्य निर्मिती :**
**डॉ. संजय शिंदे**
**हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

**संदर्भ ग्रंथ: साहित्य समीक्षा विचार : डॉ. वेदश्री थिगळे, डॉ. प्रभाकर जोशी, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती जानेवारी २०२१**

SANJAY MARHRM